**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५२/२०२६**
निशाण क्र. १
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००११४–२०२६**

आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा प्रकरण २१ व कलम २७४ प्रमाणे
भारतीय नागरीक सुरक्षा संहितेमध्ये देवगड येथील **श्रीकांत एस. पचंडी, न्यायदंडाधिकारी वर्ग–१, देवगड** यांचे न्यायालयात

| | | |
|---|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : | ०३/०३/२०२६ |
| २) अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०३/०३/२०२६ |
| ३) फिर्याददाराचे नाव व पत्ता | : | प्रविण मनोहर सावंत<br>वय– ५४ वर्षे<br>स.पो.फौ/८५४<br>नेमणुक– देवगड पोलीस ठाणे,<br>ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |
| ४) आरोपीचे नाव व पत्ता | : | रामा मल्लारी करे<br>वय–३५वर्षे, धंदा– मोलमजुरी,<br>रा. जामसंडे, बौध्दवाडी,<br>ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |

गुन्हयाची हकीकत

दि.०३/०३/२०२६ रोजी १२.१० वा. च्या सुमारास मौजे जामसंडे गुमास्ते दवाखान्या समोर, ता.देवगड येथे तुमचे ताब्यातील हिरो होंडा स्प्लेंडर गाडी क्र.एम.एच.०७–एव्ही–९३६१ हे वाहन धोकादायक स्थितीत, रस्त्यावरुन येणा–या जाणा–या लोकांचे जिवीत अगर व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल अशा पध्दतीने वाहतूकीस अडथळा होईल अशा प्रकारे लावली व त्यायोगे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८५ प्रमाणे गुन्हा केला आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्र.क्र.१: तुम्हाला कागदपत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्र.क्र.२: तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला आरोप समजला काय ?

उत्तर : होय.

प्र.क्र.३: तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

-----------

आरोपीची सही

समक्ष,

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.14 12:41:16 +0530

(श्रीकांत एस. पचंडी )
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, देवगड
पॅनेल प्रमुख

आरोपीस गुन्हयाबाबतचा तपशील वाचून दाखविला व मराठीत समजावून सांगितला.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.14 12:41:25 +0530

दिनांक: १४/०३/२०२६

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड
पॅनेल प्रमुख

## न्यायनिर्णय

प्रतिकथनातील मजकूर आरोपीला मराठी भाषेत समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल असल्याचे सांगितले. आरोपीला खालील बाबी समजावून सांगितल्या.

(अ) आरोपीने गुन्हयाची कबूली दिल्यास त्यास खटल्याच्या चौकशीचा अधिकार सोडून द्यावा लागेल.

(ब) आरोपीवर गुन्हयाची कबूली देणेस बंधनकारक नाही. तरी देखील त्याने गुन्हयाची कबूली दिल्यास त्याच्या विरुध्द दोषी असल्याची कागदोपत्री नोंद होईल.

(क) जर त्याने गुन्हा कबूल केला तर अपील करण्याचा त्याचा हक्क संपुष्टात येईल.

गुन्हयाच्या कबुलीचे परिणामाची जाणीव करुन देखील गुन्हा कबूल करणार असल्याचे आरोपीने प्रतिपादन केले. अशा परिस्थितीत त्याने दिलेली गुन्हयाची कबुली ही स्वेच्छेने व विना दडपण दिलेली आहे याची मला खात्री झाली आहे. सबब, मी त्याची कबुली स्वीकारुन त्याला दोषी धरत आहे. शिक्षेबाबत आरोपीला विचारले असता त्याने नि.क्र.२ येथे पुरशीस दाखल करुन त्याचे हातून सदरचा गुन्हा अनावधानाने घडलेला असून त्याला या गुन्हयाबाबत पश्चाताप होत असल्याचे सांगून पुन्हा अशा प्रकारचा गुन्हा करणार नाही असे सांगितले. तसेच त्याने कमीत कमी द्रव्य दंडावर मुक्त करण्याची विनंती केली. आरोपीचे प्रतिकथन व गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता पुढील प्रमाणे आदेश करणे न्यायोचित होईल असे माझे मत आहे. सबब, मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. आरोपी रामा मल्लारी करे यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८५ च्या शिक्षापात्र गुन्ह्या करीता रक्कम रुपये ३००/– (रुपये तीनशे फक्त) द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

२. आरोपीने दंड न भरल्यास त्यास दोन दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

३. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.14 12:41:37 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
न्यायदंडाधिकारी वर्ग – १, देवगड
पॅनेल प्रमुख

दिनांक – १४/०३/२०२६